



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 51, 900/-
20 कॅरेट मणी = 1, 38, 100/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 24, 280/-
16 कॅरेट मुरणी = 1, 10, 475/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ५४ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । ०४/०३/२०२६ । पाने - ६




# सव्वा वर्षात प्रत्येक गावात विकास निधी दिला - आ. खताळ

## गुंजाळवाडी, राजापूर, सायखिंडी, चिकणी, निमगाव भोजापूर, मेंगाळवाडी येथील विकास कामांचा शुभारंभ



**गुंजाळवाडीमध्ये काही जण भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करत आहे परंतु कार्यकर्त्यांनी त्यांना त्यांच्या घरात जाऊन जाब विचारने गरजेचे आहे, जर महायुतीच्या कार्य कर्त्यांना कोणी विनाकारण त्रास देण्याचा प्रयत्न केला तर त्यांना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी ठामपणे उत्तर देणे गरजेचे आहे चुकीचे काम आम्ही सांगणार नाही; मात्र गावातील शांतता भंग करण्याचा जर कोणी प्रयत्न करत असेल तर त्याच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल.**

**- आ. अमोल खताळ**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आपण सव्वा वर्षाच्या काळात विधानसभा मतदार संघातील प्रत्येक गावा-गावामध्ये निधी देण्याचे काम केले आहे आणि भविष्यातही करू असा विश्वास व्यक्त करत निधी वाटप करताना कधीही भेदभाव केला नाही कोण आपला अन कोण-परका असा भेदभाव केला नाही ज्या भागावरती अन्याय झाला आहे त्या भागासाठी प्राधान्याने विकासनिधी देण्याचा आपला प्रयत्न आहे. भविष्यात महायुती सरकारच्या माध्यमातून भरीव स्वरूपाचा निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

तालुक्यातील गुंजाळवाडी, राजापूर, निमगाव, भोजापुर, चिकणी, सायखिंडी आणि मेंगाळवाडी येथील विविध विकासकामांचा शुभारंभ आमदार खताळ यांच्या हस्ते झाला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भाजप ज्येष्ठ नेते नामदेव गुंजाळ, राधुनाना गुंजाळ, संभाजी गुंजाळ, सूर्यभान गुंजाळ, पंढरीनाथ गुंजाळ, रोहिदास गुंजाळ, देवराज थोरात, विक्रम गुंजाळ, महेश जगताप, गोकुळ गुंजाळ राजापूर येथील, बबन हासे, सावळेराम खतोडे, आनाजी खडांगळे, आण्णा हासे, बाळासाहेब सोनवणे, ऋषिकेश हासे, गोपिनाथ सोनवणे संदेश देशमुख, सोमनाथ खतोडे, कारभारी वलवे, सरपंच ज्योती कडलग, उपसरपंच प्रमोद कडलग, दत्तात्रय गुंजाळ, अशोक कानवडे, बाळासाहेब कडलग, लहानू पाटील चाबुस्कर, भाऊसाहेब धुमाळ, संतोष टपाले, त्र्यंबक फटांगरे, मनोहर कडलक, वाल्मिक शिंदे, सरपंच गायत्री माळी, उपसरपंच संदीप वर्पे, मनसेचे उप जिल्हाध्यक्ष दिपक वर्पे, एकनाथ वर्पे, मच्छिन्द्र विखे आदी मान्यवर उपस्थित होते

आमदार खताळ म्हणाले की, विधान सभा निवडणुकीच्यापूर्वी अनेकांनी केवळ भूमिपूजनाचे फलक लावले मात्र त्या कामांचे पुढे काय झाले याचा जाब जनतेने विचारणे गरजेचे आहे. येथून मागील कालावधीमध्ये निवडणुका आल्या की फक्त घोषणा व फलक लावून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. महायुती सरकारच्या माध्यमातून झालेला विकास गावागावातील जनतेपर्यंत पोहोचवणे ही कार्यकर्ते म्हणून आपली जबाबदारी आहे. निळवंडे डावा आणि उजवा कालव्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू आहे प्रवरा व म्हाळुंगी नदी वाहती आहे दोन्ही कालव्यांमुळे. गावातील बंधारे व तलाव भरून देण्यासाठी सरकार सहकार्य करत असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

# खामेनींच्या हत्येवर दिल्लीच्या मौनाने आश्चर्य - सोनिया गांधी



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

काँग्रेसच्या राज्यसभा खासदार सोनिया गांधी यांनी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्या मृत्यूवर भारत सरकारच्या शांततेबद्दल तीव्र प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी म्हटले - ही शांतता तटस्थता नाही, तर जबाबदारीपासून पळ काढणे आहे. सोनिया गांधींचा संपादकीय लेख एका वृत्तवाहिनीत प्रकाशीत झाला. त्यांनी लिहिले - १ मार्च रोजी इराणने पुष्टी केली की त्यांचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांची एक दिवसापूर्वी अमेरिका आणि इस्त्रायलच्या लक्ष्यित हल्ल्यात हत्या करण्यात आली. सध्या सुरू असलेल्या राजनैतिक चर्चेदरम्यान कोणत्याही विद्यमान राष्ट्राध्यक्षाची हत्या समकालीन आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये गंभीर दुरावा आहे.

सोनिया गांधींनी लिहिले आहे की ही घटना जितकी धक्कादायक आहे, त्याहून अधिक धक्कादायक नवी दिल्लीची शांतता आहे. भारत सरकारने ना हत्येचा निषेध केला आणि ना इराणच्या सार्वभौमत्वाच्या उल्लंघनावर कोणतीही स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस खासदारांनी लिहिले की, पंतप्रधान मोदींनी सुरुवातीच्या निवेदनात अमेरिका-इस्त्रायलच्या मोठ्या हल्ल्याकडे दुर्लक्ष करत केवळ यूएईवरील इराणच्या प्रत्युत्तरादाखल कारवाईचा निषेध केला. नंतर त्यांनी 'गहरी चिंता' आणि 'संवाद व मुत्सद्देगिरी' याबद्दल बोलले, तर हल्ला त्याच वेळी झाला जेव्हा मुत्सद्देगिरीची प्रक्रिया सुरू होती.

सोनिया गांधी म्हणाल्या की, संसदेच्या पुढील बैठकीत इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या लक्ष्यित हत्येवर, त्यावर भारत सरकारचे मौन आणि यामुळे आंतरराष्ट्रीय कायदा व सार्वभौमत्वाच्या सिद्धांतांचे कमकुवत होणे या मुद्द्यांवर खुली चर्चा झाली पाहिजे. आंतरराष्ट्रीय नियमांचा विनाश आणि पश्चिम आशियातील वाढती अस्थिरता भारताच्या धोरणात्मक आणि नैतिक हितांशी संबंधित आहे.

त्या म्हणाल्या की, भारत दीर्घकाळापासून 'वसुधैव कुटुंबकम' बद्दल बोलत आहे, जो केवळ एक औपचारिक नारा नाही, तर न्याय, संयम आणि संवादाची वचनबद्धता आहे. अशा वेळी जेव्हा नियम-आधारित व्यवस्था दबावाखाली आहे, तेव्हा शांत राहणे म्हणजे जबाबदारीपासून दूर पळणे आहे.

# संगमनेरात गुटखा तस्करी जोरात

## गुटख्यासह १९ लाखांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे महामार्गावरील कऱ्हे घाट परिसरात संगमनेर तालुका पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धाडसी कारवाई करत गुटखा आणि सुगंधी तंबाखूच्या अवैध वाहतुकीचा मोठा साठा उघडकीस आणला. या कारवाईत तब्बल १९ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २ मार्च २०२६ रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास तालुका पोलिसांचे पथक नियमित गस्त घालत असताना कऱ्हे घाटात एक पांढऱ्या रंगाची महिंद्रा स्कॉर्पिओ (एमएच ४६ एक्स ४०४६) संशयास्पद हालचाली करताना दिसली. पोलिसांनी तात्काळ वाहन अडवून झडती घेतली असता वाहनात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखूचा साठा आढळून आला.

झडती दरम्यान ६ लाख ५३ हजार ४०० रुपये किमतीचा विमल पान मसाला आणि ६६ हजार ६०० रुपये किमतीची सुगंधी तंबाखू असा एकूण ७ लाख २० हजार रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला. तसेच गुन्ह्यात वापरलेली १२ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ गाडी देखील पोलिसांनी ताब्यात घेतली. त्यामुळे जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १९ लाख २० हजार रुपये इतकी आहे.

या प्रकरणी पोलीस हवालदार अमित महाजन यांच्या फिर्यादीवरून शाम कोंडीभाऊ काळे (रा. रणखांबफाटा, संगमनेर), युसुफ चौगुले (रा. घारगाव, संगमनेर) आणि सिल्वासा येथील शक्ती ट्रेडर्सचा मालक धिरज माळी यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ९४/२०२६ अन्वये बी.एन.एस. कलम १२३, २७४, २७५, २२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

प्राथमिक तपासात आरोपी शाम काळे हा वाहन चालवत होता तर युसुफ चौगुले यांच्या सांगण्यावरून सिल्वासा येथून हा माल आणला जात होता अशी माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा तपास संगमनेर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश शिंदे करत आहेत. महामार्गावर पहाटेच्या सुमारास पार पडलेल्या या कारवाईमुळे अवैध गुटखा तस्करांमध्ये खळबळ उडाली असून, पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा साठा बाजारात पोहोचण्यापूर्वीच जप्त करण्यात यश आले आहे.

# युद्धामुळे गॅस, खनिज तेल भडकणार



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळं जगासमोर नवं संकट निर्माण झालं आहे. भारताला देखील या युद्धाची झळ बसू लागली आहे. शेतमालाच्या निर्यातीवर परिणाम तर होणारच आहे. मात्र, इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतल्यानं ऊर्जा क्षेत्रापुढं नवी समस्या निर्माण झाली आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध दीर्घकाळ सुरु राहिलं तर भारतासमोर एलपीजीची मोठी समस्या निर्माण होऊ शकते. याशिवाय पेट्रोल आणि डिझेलची गरज भागवण्यासाठी भारताला नवे पर्याय शोधावे लागतील.

कतार सरकारच्या मालकीच्या कतार एनर्जी या कंपनीनं इराणच्या हल्ल्यानंतर एलएनजीचं उत्पादन थांबवलं आहे. इराणनं कतार एनर्जीच्या दोन मुख्य गॅस प्रोसेसिंग यूनिटवर हल्ला केला होता. यामुळं युरोपियन गॅसचे दर वाढले आहेत. यूरोपियन गॅसच्या दरात ५० टक्के वाढ झाल्याचं वृत्त ब्लूमबर्गनं दिलं आहे. इराण आणि अमेरिका युद्धाचा परिणाम एलपीजीवर होणार आहे. भारत आखाती देशातून ८० ते ८५ टक्के एलपीजीची आयात करतो. याचा पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनी मार्गे होतो. यामुळं भारतासमोर एलपीजीचं मोठं आव्हान निर्माण होऊ शकतं. भारताकड कच्चा तेलाप्रमाणं गॅसचा राखीव साठा नाही. त्यामुळं एलपीजीचा नियमित पुरवठा होणं महत्त्वाचं आहे.

एलपीजीप्रमाणं एलएनजीचा साठा देखील भारताकडे नाही. सध्या भारत ६० टक्के एलएनजी होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या मार्गे मागवतो. यामुळं एलपीजी आणि एलएनजीसाठी भारताला नवे पर्याय शोधावे लागतील. इराणनं ड्रोन हल्ला केल्यानं जगातील एलएनजीचा मोठा पुरवठादार देश असलेल्या कतारनं उत्पादन थांबवलं आहे. सध्या कतार जगातील एलएनजी उत्पादन करणारा पाचवा देश आहे. आता कतारनं उत्पादन थांबवल्यानं एलएनजीच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो.

भारताला पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यासाठी तात्काळ चिंता करण्याचं कारण नाही. भारताकडे सध्या ७० ते ८० दिवस पुरेल इतका तेलाचा साठा आहे. भारतानं गेल्या महिन्यात सौदी अरेबियाकडून मोठ्या प्रमामात तेल खरेदी केलं आहे.मात्र, इराण युद्धामुळं कच्चा तेलाच्या दरात वाढ होऊ शकते, असं सांगितलं जातं आहे. येत्या काळात कच्चा तेलाचे दर १०० डॉलर प्रति बॅरल होऊ शकतात.दरम्यान, सोमवारी पेट्रोलियम विभागाकडून सोमवारी एका बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं.







# माजी प्राचार्य व विचारवंत वाघमारे यांचे निधन



नांदेड (वृत्तसंस्था)

माजी खासदार, माजी कुलगुरू आणि विचारवंत डॉ. जनार्दन माधवराव वाघमारे यांचे सोमवारी सकाळी साडेआठ वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण, समाजकारण आणि सार्वजनिक जीवनातील एक ज्येष्ठ, अभ्यासू व वैचारिक नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

११ नोव्हेंबर १९३४ रोजी जन्मलेल्या डॉ. वाघमारे यांनी आयुष्यभर शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. शिक्षणतज्ज्ञ, साहित्य अभ्यासक आणि राजकारणी म्हणून त्यांनी राज्यात व देशात स्वतंत्र ओळख निर्माण केली. डॉ. वाघमारे हे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक व पहिले कुलगुरू होते. रचना विद्यापीठाच्या स्थापनेपासून शैक्षणिक पायाभूत उभारण्यापर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मराठवाड्यात उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली करण्यामागे त्यांचा मोठा वाटा होता. इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. निग्रो साहित्य, दलित साहित्य आणि पुरोगामी साहित्य चळवळीवर त्यांनी सखोल अभ्यासपूर्ण लेखन व संशोधन केले. सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनवादी विचारसरणी यांवर त्यांनी परखड मांडणी केली. डॉ. वाघमारे हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून राज्यसभेवर निवडून गेले होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# संगमनेर खुर्द कचरा डेपो प्रश्नावरती स्वतंत्र बैठक घेणार - ना. विखे

## रायतेवाडी फाटा ते प्रवरा नदी पूल स्ट्रीट लाईटचा ना. विखे, आ. खताळांच्या हस्ते शुभारंभ

पुणे-नाशिक महामार्गाचे रायतेवाडी फाटा ते संगमनेर खुर्द प्रवरानदी पूलापर्यंत चौपदरीकरण होऊन पथदिवे लावण्याचे काम केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून झालेले आहे. या पथदिव्यांचा संगमनेर खुर्द व परिसरात चांगलाच प्रकाश पडलेला आहे. हा प्रकाश आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांवर सुद्धा पडला पाहिजे.

**ना राधाकृष्ण विखे पाटील**
जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री



महायुती सरकारच्या माध्यमातून तो निधी या विधानसभा मतदारसंघात आला आहे तो आपणच आणला आहे. हे गावागावातील नागरिकांना पटवून देण्याचे काम महायुती कार्यकर्त्यांनी करावे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जेव्हा होतील तेव्हा होऊ द्या परंतु आपण फक्त निवडणुकांपुरते काम करत नाही तर २४ तास काम करत राहतो. लोकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तुम्ही कार्यरत असले पाहिजे. आरे ला कारे म्हणण्याची हिंमत तुमच्यात असली पाहिजे. संगमनेर खुर्दमध्ये काहीजण स्वतःला दादा समजत आहे. त्यांची दादागिरी अजिबात सहन केली जाणार नाही. आम्हाला जास्त खोलात जायला सांगू नका. ग्रामपंचायतवरती आता प्रशासक बसले आहे. त्यामुळे ज्या -ज्या ग्रामपंचायत मध्ये भ्रष्टाचार झाला आहे तो बाहेर काढून त्यांना शिक्षा होईपर्यंत महायुतीकार्यकर्त्यांनी लढत राहावे.

**- अमोल खताळ पाटील**
आ. संगमनेर विधानसभा

**युवावार्ता (प्रतिनिधी)**
**संगमनेर** - संगमनेर खुर्द येथील कचरा डेपो बाबतची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन दरम्यान किंवा अधिवेशनानंतर स्वतंत्र बैठक घेऊन या कचरा डेपोबाबत कायम स्वरूपीचा तोडगा काढला जाईल असा विश्वास राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा यांनी संगमनेर खुर्द वासियांना दिली.

संगमनेर तालुक्यातील रायतेवाडी फाटा ते संगमनेर खुर्द प्रवरा नदी पुलापर्यंत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून झालेल्या महामार्ग चौपदरीकरण वरील स्ट्रीट लाईटचे काम पूर्ण झाले आहे. त्या कामाचे लोकार्पण पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपचे ज्येष्ठ नेते सुदामराव सानप, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, माजी सरपंच भाऊसाहेब गुंजाळ, उपसरपंच गुलाब शेख, संगमनेर साखर कारखान्याचे माजी संचालक बाळासाहेब शिंदे, महायुतीचे प्रमोद राहणे, काशिनाथ पावसे, राजन शिंदे, रौफ शेख, शरद पावबाके, महेश मांडेकर, बाळासाहेब शिंदे, निलेश गुंजाळ, सचिन पावबाके, संकेत खुळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राजन दादा शिंदे युवा मंचच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमदार अमोल खताळ पाटील यांना क्रेनच्या साह्याने पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

नामदार विखे पाटील म्हणाले की लोणी व परिसरातील चार ते पाच ग्रामपंचायतींनी एकत्र येऊन कचऱ्यावरती प्रक्रिया करणारा प्रकल्प सुरू केला आहे. कचऱ्यावरती प्रक्रिया करणारा प्रकल्प राबवणारी लोणी ही ग्रामपंचायत संपूर्ण राज्यात पहिली ग्रामपंचायत ठरली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. संगमनेर खुर्द येथील कचरा डेपो कुरण येथे हलविण्या बाबत संगमनेर खुर्द करांनी मागणी केली आहे. परंतु हा कचरा डेपो कुरण येथे हलविला तर तेथेही स्थानिक नागरिकांकडून आंदोलनाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कचऱ्यावर प्रक्रिया करणारे आधुनिक तंत्रज्ञान वापरून कायमस्वरूपी त्या कचऱ्या वर काय उपाययोजना करता येईल याबाबत बैठकीमध्ये विचार विनिमय केला जाईल. अनेक वर्षांपासून या संगमनेर खुर्द भागातील नागरिकांनी अन्याय सहन केला असून आता महा युती सरकार त्यांच्या पाठीशी ठाम पणे उभे राहील आणि हा कचरा डेपो चा प्रश्न कायमस्वरूपी चा निकाली काढू असा विश्वास मंत्री विखे यांनी दिला.

# अकोले-संगमनेरमध्ये गायींचा मृत्यू, लाखोंचे नुकसान

## १०० टक्के नुकसान भरपाईची मागणी; मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन

**युवावार्ता (प्रतिनिधी)**
**संगमनेर/अकोले** - अहिल्यानगर, पुणे, नाशिक आणि बीड जिल्ह्यांत गायींमध्ये अज्ञात आजाराचा प्रादुर्भाव होऊन मोठ्या प्रमाणावर मृत्यू होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर व पारनेर तालुक्यांत परिस्थिती गंभीर असल्याचे समोर आले.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) सेवानिवृत्त विभागाचे कार्यकारी अध्यक्ष ज्ञानेश्वर गायकर पाटील यांनी पशुसंवर्धन मंत्री पंकजा



मुंडे यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला यामुळे मोठा फटका बसला आहे.

दुभत्या गायींना ग्रामीण भागात 'कामधेनू'चे स्थान आहे. या जनावरांच्या मृत्यूमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत असून दूध उत्पादन घटल्याने ग्रामीण अर्थचक्र विस्कळीत होत आहे. आधीच विविध नैसर्गिक व आर्थिक संकटांना तोंड देणारा बळीराजा या नव्या संकटामुळे हवालदिल झाला आहे. या निवेदनात खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यात १००% आर्थिक नुकसानभरपाई: मृत गायींच्या मालकांना तातडीने संपूर्ण आर्थिक भरपाई द्यावी.

तज्ज्ञ समिती व प्रयोगशाळा तपासणी - आजाराचे नेमके कारण शोधण्यासाठी तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांची समिती नेमून नमुन्यांची प्रयोगशाळा तपासणी करावी. संभाव्य संसर्ग रोखण्यासाठी प्रभावी लसी ग्रामीण स्तरावर युद्धपातळीवर मोफत उपलब्ध करून द्याव्यात.

पशुखाद्यातील भेसळ किंवा विशिष्ट इंजेक्शनमुळे आजार बळावला आहे का, याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. पशुसंवर्धन विभागाने त्वरित पावले उचलून परिस्थिती नियंत्रणात आणावी, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित निवेदनाची प्रत पशुसंवर्धन विभागाचे सचिव, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना देखील पाठविण्यात आली.

# अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार सुरू

**मुंबई (वृत्तसंस्था)**
अपंग व्यक्तींना स्वयंरोजगार सुरू करण्याकरिता आवश्यक साधने (टूलकिट) खरेदीसाठी आता कमाल १५ हजार आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाने घेतला आहे. आजपर्यंत या योजनेद्वारे फक्त एक हजार अर्थसहाय्य देण्यात येत होते. या योजनेमुळे अपंग व्यक्तींना स्वावलंबी होण्यास तसेच स्वतःचा व्यवसाय उभारण्यास मोठी मदत होईल, असे विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचे म्हणणे आहे.

अपंग व्यक्ती कौशल्याधारित व्यवसाय जसे की शिवणकाम, मोबाईल दुरुस्ती, संगणक सेवा, ब्यूटी पार्लर, इलेक्ट्रिकल कामे, सुतारकाम, वाहन दुरुस्ती असे किरकोळ व्यवसाय करण्यास इच्छुक असतात. मात्र आवश्यक साधनसामग्रीच्या अभावामुळे त्यांना अडचणी येतात. महाराष्ट्र शासनाच्या विकसित महाराष्ट्र, २०४७ या कृती आराखड्यातील अपंग सक्षमीकरणविषयक रोजगार व स्वयंरोजगार या ध्येयाचा एक भाग म्हणून शासनाने ही योजना कार्यान्वित केली आहे.

ही योजना अपंगांच्या सर्व प्रवर्गांसाठी लागू असून प्रशिक्षित अपंग अर्जदाराने शासकीय किंवा शासनमान्य प्रशि प्रशिक्षण संस्थेतून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. या योजनेमध्ये प्रशिक्षित अपंग महिलांना प्राधान्य देण्यात येत असून निधी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने आधारसंलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे करण्यात येणार आहे. निधी वितरित झाल्यानंतर लाभार्थ्याने व्यवसाय सुरू केल्याची खातरजमा करण्यात येईल. ही योजना अपंग व्यक्तींना उद्योजकतेकडे प्रवृत्त करून त्यांच्या आर्थिक स्वावलंबनास् चालना देणारी ठरणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी अपंग सक्षमीकरण विभागाच्या **https://divyangsahayak portal.maharas** या संकेतस्थळाला भेट देवून या योजनेकरिता नोंदणी करावी व लाभ घ्यावा, असे आवाहन दिव्यांग कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

# दोन वर्षात लाखावर महिला तर 23 हजारांवर मुली बेपत्ता

## नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्यांमुळे पालक चिंताग्रस्त



**२०२४-२५ मध्ये राज्यात ९३ हजार त्यापैकी ६७ हजार ४५८ महिला ९४० महिला बेपत्ता झाल्या होत्या, मिळून आल्या तर २६ हजार ४८२ त्यांचा शोध अजूनही सुरुच महिला अजूनही बेपत्ताच आहेत. आहे. अल्पवयीन मुला-मुलींच्या बाबतीतही तीच स्थिती आहे. २३ हजार ४२९ बेपत्ता पैकी १८ हजार ७७० शोध लागला असून अजूनही ४ हजार ५९ मुलींचा शोध लागला नाही. त्या कुठे आहेत माहिती नाही.**

**पुणे (वृत्तसंस्था)**
महाराष्ट्रात सन २०२४ ते २०२५ या दोन वर्षांत ९३ हजार ९४० सज्ञान महिला तर २३ हजार ४२९ अल्पवयीन मुली बेपत्ता असल्याची नोंद पोलिसांत असून त्यापैकी अजूनही २६ हजार ४८२ महिला आणि ४ हजार ६५९ अल्पवयीन मुलींचा शोध घेण्यात पोलिस यंत्रणेला यश आले नाही. दुसरीकडे नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्या असल्याने पालकांत चिंतेचे वातावरण आहे.

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असून त्यात बेपत्ता महिला आणि मुलींच्या विषयावरील चर्चेतून राज्याची जी आकडेवारी समोर आली आहे, त्यातून हा विषय वरचेवर गंभीर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री या नात्याने संदर्भात माहिती देताना २०२४-२०२५ मध्ये १५ ते १८ वयोगटातील हरवलेल्या मुला-मुलींपैकी ९६ टक्के पेक्षा जास्त मुले व मुली मिळून आल्याचे सांगितले आहे. ४५ मानव तस्करी विरोधी विभाग स्थापन करण्यात आले आहेत. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचारांना आळा घालण्यासाठी पोलिस काका व पोलिस दीदी उपक्रम राबविण्यात येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील चंद्रपूर, मुंबई शहर, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड अशा शहरात नवजात बालक विक्री झाल्याच्या तक्रारी झाल्या आहेत. पाच बालकांची विक्री झाल्याचा संशय आहे. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे २४ डिसेंबर २०२५ रोजी ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अशा घटना घडल्याने पालकांची चिंता वाढली आहे. बालकांवरील शाळांमधील अत्याचार रोखण्यासाठी नुकतेच २ फेब्रुवारी रोजी शाळांचे सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान, मिसिंग सेल सुरू करण्यात आला आहे. यात हरवलेल्या महिला व बालकांच्या शोधासाठी मिसिंग सेल सुरू केले असून २ विशेष मोहिमांमधून ५०६६ महिला, २७७१ बालकांचा शोध लागला. राज्यात जुलै २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेर १३ ऑपरेशन मुस्कान राबवण्यात आले त्यात ४११९३ लहान मुले-मुली तर या वर्षी २० जानेवारी ते २० फेब्रुवारी मोहिमेत १६ फेब्रुवारीअखेर ४५४ मुले व ९४७ मुलींचा शोध लावण्यात यश आले आहे.

# राजूर शहरला भंडारदरा धरणातून पाणी द्या

## राजूर ग्रामस्थांची मागणी, गाव बंद ठेवून रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**युवावार्ता (प्रतिनि**
**राजूर**-आदिवासी भागातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेली राजूर शहराला वाढती लोकसंख्या लक्षात घेता भंडारदरा धरणातून राजूर गावाला पाईप लाईनमधून पाणी मिळावे, यासाठी दि. ६ मार्च रोजी राजूर गाव बंद ठेऊन रास्तारोको आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही राजूर गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम असून अद्यापपर्यंत तो निकाली निघालेला नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजना कालबाह्य झालेल्या आहेत. सुधारित योजना अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे गावास दररोज शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही.

गेल्या दहा महिन्यांपासून राजूर गावात सहा दिवसांनी अनियमित पाणीपुरवठा केला जात आहे. राजूर हे मध्यवर्ती गाव आहे. ज्याप्रमाणे इतर शहरांना धरणातून थेट पाणी दिले जाते, त्याच धर्तीवर राजूरला भंडारदरा धरणातून पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र योजना मिळावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ६ मार्च रोजी गाव पूर्णतः बंद ठेवून 'रास्ता रोको' आंदोलन करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे. शासनाने तातडीने राजूरसाठी नवी पाणी योजना मंजूर करावी, असा ठराव ग्रामसभेत करण्यात मंजूर करण्यात आला आहे अशी माहिती संतोष मुर्तडक यांनी दिली.

यावेळी राजूर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक अनिल मोरे यांना किरण माळवे, संतोष मुर्तडक, सुनील सोनार, राजेंद्र वाघ, गुलाब तांबोळी आदींनी निवेदन दिले. दरम्यान, गावाला सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी असल्याचे निवेदनात नमूद केले असून या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, तहसीलदार, मुख्य कार्यकारी अधिकारी आदींना देण्यात आले आहे.

# संगमनेरात 'झाकाळल्या नभात' काव्यसंग्रहाचे गुरुवारी प्रकाशन




**युवावार्ता (प्रतिनिधी)**
**संगमनेर** - साहित्यप्रेमींसाठी आनंदाची बातमी असून गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत व्यापारी असोसिएशन हॉल, संगमनेर येथे साहित्य कला मंच आयोजित 'झाकाळल्या नभात' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडणार आहे. हा काव्यसंग्रह ड. सुभाष गोडगे यांनी लिहिलेला असून त्यांच्या साहित्य प्रवासातील हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

या कार्यक्रमात समाजात वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत


कवी ॲड. सुभाष गोडगे

असलेल्या आदर्श सार्वजनिक वाचनालयांचा विशेष सत्कार करून त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. ज्ञानप्रसाराचे कार्य करणाऱ्या या वाचनालयांच्या योगदानाचा गौरव करण्याचा साहित्य कला मंचचा हा स्तुत्य उपक्रम आहे. तसेच आयोजित काव्यस्पर्धेतून निवड झालेल्या स्पर्धकांना यावेळी पारितोषिक वितरण करण्यात येणार असून नवोदित कवी-लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

साहित्यप्रेमी, वाचक, कवी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास शोभा वाढवावी व आयोजकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन ड. सुभाष गोडगे यांनी केले आहे.

# ट्रॅक्टर उलटून शेतकऱ्याचा मृत्यू

**मवेशी गावाजवळील वळणावर घडली दुर्घटना**

**युवावार्ता (प्रतिनिधी)**
**अकोले-** आपल्या शेतात घरबांधणीसाठी साहित्य वाहून नेत असताना ट्रॅक्टर उलटून तरुण शेतकरी महेश दिनकर भांगरे (वय ३४) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने राजूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

महेश भांगरे आपल्या शेतात घर बांधण्यासाठी ट्रॅक्टरमधून कच व बांधकाम साहित्य घेऊन जात होते. ट्रॅक्टरमध्ये त्यांच्या शेजारी मित्र संतोष कोंडार बसले होते. मवेशी गावाजवळील कच्च्या रस्त्यावरील वळणावर ट्रॅक्टर अडकला. ट्रॅक्टर मागे सरकण्याची शक्यता लक्षात येताच महेश यांनी संतोष कोंडार यांना खाली उडी मारण्यास सांगितले. संतोष यांनी महेश यांनाही उडी घेण्यास सांगितले. मात्र, त्याच क्षणी ट्रॅक्टर उलटून त्याखाली सापडून भांगरे यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले; मात्र तोपर्यंत महेश यांचा मृत्यू झाला होता. तत्काळ राजूर पोलिसांना कळविण्यात आले. राजूर पोलिस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल संजय मंडलिक यांनी मृताचे भाऊ देवराम दिनकर भांगरे यांच्या खबरीवरून अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मृतदेहाची उत्तरीय तपासणी करून तो नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.













# शिक्षकाकडून शोषण, विद्यार्थीनी गरोदर



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

संगमनेर-तालुक्याच्या पठारभागात एका आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीचे शिक्षकाने शारीरिक शोषण करून गर्भवती केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पिंपरी चिंचवड येथे गुन्हा दाखल झाल्यानंतर घारगाव पोलिसांत झिरो नंबरने वर्ग झाला आहे.

याबाबत घारगाव पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित विद्यार्थिनी आठवीमध्ये शिक्षण घेत आहे. मात्र, तिच्या घरगुती कारणामुळे शाळेत एकटी राहत होती. याचा गैरफायदा आरोपी शिक्षक अमोल बाबासाहेब भोसले (वय २३) याने घेत, ती अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिचे शारीरिक शोषण केले. ती पिंपरी चिंचवड येथील रुग्णालयात उपचारांसाठी दाखल असताना, ती गर्भवती असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. पीडित विद्यार्थिनीने दिलेल्या जबाबावरून पिंपरी चिंचवड पोलिसांनी आरोपी शिक्षक अमोल भोसले याच्यावर भारतीय न्यायसंहिता आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर झिरो नंबरने हा गुन्हा घारगाव पोलिसांत वर्ग करण्यात आला आहे. यातील आरोपी शिक्षकाला अटक करून न्यायालयात हजर केले असता, शुक्रवारपर्यंत (दि. ६) पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक एस. डी. टकले हे करत आहे.

# 'पालखी' चित्रपटाचे 'भक्ती शक्ती' मंदिरात चित्रीकरण उत्साहात



## साईभक्तीचा आणि दिग्गज कलाकारांचा अनोखा संगम

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

दरवर्षी हजारो भाविक मुंबईहून पायी पालखी घेऊन शिर्डीच्या श्री साईबाबा समाधी मंदिरात जातात. याच साईभक्तांच्या अढळ श्रद्धेवर, निस्वार्थ सेवेवर आणि भक्तीच्या ऊर्जेवर आधारित 'पालखी' या भव्य मराठी चित्रपटाची निर्मिती सध्या वेगाने सुरू आहे. महाराष्ट्र राज्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या भव्य संकल्पनेतून हा चित्रपट साकारत आहे. 'श्रद्धा ही केवळ भावना नसून आयुष्याला नवी दिशा देणारी शक्ती आहे', या त्यांच्या विचारधारेवर आणि साईबाबांच्या अगाध लीलेवर आधारित हा चित्रपट लाखो साईभक्तांसाठी एक मोठी प्रेरणा ठरणार आहे. एका सामान्य युवकाच्या जीवनातील संघर्ष, प्रश्न आणि वेदनांच्या काळोखातून आशेच्या प्रकाशाकडे नेणारा हा प्रवास मा. रवींद्रजी चव्हाण यांच्या अत्यंत कल्पक दृष्टिकोनातून प्रेक्षकांसमोर प्रभावीपणे मांडला जाणार आहे.

या बहुचर्चित चित्रपटातील काही अत्यंत महत्त्वाच्या दृश्यांचे चित्रीकरण नुकतेच १८ फेब्रुवारी २०२६ रोजी संगमनेर (कऱ्हे) येथील डॉ. भानुदास डेरे फाउंडेशन कॅम्पसमधील भव्य आणि निसर्गरम्य 'भक्ती शक्ती' मंदिरात अत्यंत उत्साहात पार पडले. या संपूर्ण चित्रपटाच्या निर्मितीची, चित्रीकरणाची आणि नियोजनाची अत्यंत महत्त्वाची धुरा 'डोंबिवलीकर' मॅगझिनचे कार्यकारी संपादक आणि या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते श्री. प्रभू कापसे हे समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांच्याच अचूक, शिस्तबद्ध आणि उत्कृष्ट नियोजनाखाली संगमनेरमधील 'भक्ती शक्ती' मंदिरातील हे चित्रीकरण यशस्वीरीत्या संपन्न झाले. चित्रपटासाठी त्यांनी घेतलेली अपार मेहनत आणि त्यांचे मोलाचे योगदान पाहता, याप्रसंगी डॉ. भानुदास डेरे फाउंडेशनचे अध्यक्ष ड. श्रीराजजी डेरे आणि सेक्रेटरी डॉ. भानुदासजी डेरे यांच्या हस्ते श्री. प्रभू कापसे यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन अत्यंत आदरपूर्वक स्वागत व सत्कार करण्यात आला.

संगमनेर येथील या विशेष चित्रीकरणासाठी सुप्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेता सिद्धार्थ बोडके आणि अभिनेत्री गौरी नलावडे यांनी कॅम्पसमध्ये हजेरी लावली होती. याप्रसंगी कलाकारांनी कॅम्पसमधील आयुर्वेद, फिजिओथेरपी, फार्मसी आणि नर्सिंग विभागाच्या विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. प्रवीण तरडे यांनी आपल्या खास शैलीत मार्गदर्शन करताना, छत्रपती शिवरायांचा वैचारिक वारसा जपण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले, तर सिद्धार्थ बोडके आणि गौरी नलावडे यांनी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस सदिच्छा दिल्या. सर्वच कलाकारांनी संस्थेचे काम आणि भक्ती शक्ती मंदिराच्या परिसराचे भरभरून कौतुक केले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ. अंकिता श्रीराज डेरे, आयुर्वेद कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सौ. सोनल निलेश डेरे व प्राचार्य डॉ. निलेश विश्वनाथ डेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

केएसआर फिल्म्स निर्मित 'पालखी' या चित्रपटाचे दिग्दर्शन श्रेयश राज आंगणे करत असून पटकथा व संवाद निखिल चंद्रकांत पाटील आणि श्रेयश आंगणे यांचे आहेत. या चित्रपटात सुबोध भावे, प्रवीण तरडे, सिद्धार्थ बोडके, किशोर कदम, यतिन कार्येकर, वीणा जामकर, गौरी नलावडे, संदीप गायकवाड, शंतनू रांगणेकर, ओंकार कदम, अथर्व रुके अशा मराठीतील नामवंत कलाकारांची तगडी फौज पाहायला मिळणार आहे. भक्तीची अपार ऊर्जा आणि चालती-बोलती अनुभूती देणारा हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, संगमनेरमध्ये झालेल्या या चित्रीकरणामुळे प्रेक्षकांची आणि साईभक्तांची उत्सुकता आता अधिकच वाढली आहे.

# संगमनेरमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन व अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



संगमनेर ()-

शिक्षण प्रसारक संस्थेच्या मातोश्री ललितादेवी मालपाणी शिक्षण शास्त्र महाविद्यालय, संगमनेर आणि मातोश्री इंदिराबाई रतीलाल गांधी अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन व अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विज्ञान साहित्यिक तसेच मराठी लेखक यांच्या कार्याची माहिती देणारे आकर्षक फ्लेक्स तयार करून प्रदर्शित केले. तसेच महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या बुक बँकेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख वक्ते अनिल देशपांडे यांनी आपले ध्येय आणि आपली मानसिकता या विषयावर डी.एड. व बी.एड. विद्यार्थ्यांशी संवाद साधत जीवनात स्पष्ट ध्येय निश्चित करून सकारात्मक मानसिकता ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले. अतिथी प्राध्यापक प्रा. मनीषा माका यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाची संकल्पना व त्यामागील उद्देश विद्यार्थ्यांना समजावून सांगत वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे होते.

याप्रसंगी डी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या सविता घुले, विज्ञान विभाग प्रमुख कविता काटे, मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्योती मेस्त्री, अतिथी प्राध्यापक डॉ. विवेक वाकचौरे यांच्यासह प्रा. मंगल आरोटे, प्रा. डॉ. राजू शेख, प्रा. नयना पंजे, प्रा. संजय खेमनर, प्रा. सीमा कासार, प्रा. कविता भोकनळ, प्रा. चंद्रकला सापनर, प्रा. प्रणित धीवर, प्रा. लकारे तसेच ग्रंथपाल कोमल म्हणकाळे उपस्थित होते. कार्यक्रमात प्राध्यापक मनोगत कविता काटे यांनी व्यक्त केले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून प्रेरणा मिसाळ व भक्ती आहेर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी संध्या कोटकर यांनी विज्ञान विषयावर आधारित लावणी सादर करून उपस्थितांची दाद मिळवली, तर अनुजा सराफ यांनी पसायदान सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहिणी गाडेकर यांनी केले. अतिथींचा परिचय मयुरी मेंगाळ यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्राची पाबळ व राधिका काळमेघ यांनी केले, तर आभार प्रदर्शन सार्थक शहाणे यांनी केले. शिक्षकेतर कर्मचारी वर्षा आडेप, सचिन वाकचौरे, सुनील कुदळ, सुंदर सातपुते यांनी कार्यक्रमाच्या नियोजनास विशेष मदत केली.

या कार्यक्रमास बी.एड. प्रथम व द्वितीय वर्ष तसेच डी.एड. विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमातून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन व मराठी भाषेचा अभिमान जपण्याचा संदेश देण्यात आला.

# झोळे जिल्हा परिषद प्राथ. शाळेत 'हिंद की चादर' पंधरवाडा उत्साहात

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, झोळे येथे श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दीनिमित्त 'हिंद की चादर' पंधरवडा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. १० फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी या कालावधीत राबवण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून गुरुजींच्या बलिदानाला अभिवादन करण्यात आले.

पंधरवड्याच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व इतिहासाची माहिती व्हावी, या हेतूने खालील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा. शीख धर्माचा इतिहास व मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या सांगता समारंभाप्रसंगी संगमनेर येथील रहिवासी श्री. मनज्योतसिंग पंजाबी व श्री. हरपिंदर सिंह पंजाबी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मनज्योतसिंग पंजाबी यांनी अतिशय ओघवत्या भाषेत आणि गोष्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शीख धर्माची स्थापना, इतिहास आणि श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांनी धर्माच्या रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाविषयी (शहीदी) सविस्तर माहिती दिली. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक शिवाजी बनसोडे यांनी दोन्ही पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप पावडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संदीप पावसे यांनी मानले.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित खर्डे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर वाळे, माजी अध्यक्ष बबन खर्डे, उपक्रमशील शिक्षिका सविता दिवेकर, अक्षय वाळे, प्रगती खर्डे यांच्यासह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शीख धर्माचा देदिप्यमान इतिहास व गुरुजींच्या त्यागाची माहिती मिळाली. पालकांनी व गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय मैड, केंद्रप्रमुख बाळासाहेब जाधव यांनी शाळेने आयोजित केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# नूतन महाविद्यालयात जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

राजापूर येथील प्रगतिक शिक्षण संस्थेच्या नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित 'जिल्हास्तरीय महाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धा' मोठ्या उत्साहात पार पडली. विज्ञानाचा जागर आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेत संगमनेर महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपद मिळवले.

कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय सैन्यदलातील निवृत्त मेजर लक्ष्मणराव ढोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मेजर ढोले यांनी सैन्य दलातील आपले थरारक अनुभव सांगत विज्ञानाचा संरक्षण क्षेत्रात कसा प्रभावी वापर होतो, याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सेक्रेटरी ड. कैलास हासे होते. त्यांनी मानवी जीवनातील विज्ञानाचे महत्त्व विषद केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष आर. पी. हासे, भानुदास सोनवणे व सुनिल हासे उपस्थित होते.

जिल्ह्यातील १० नामवंत महाविद्यालयांच्या संघांमध्ये ही स्पर्धा रंगली. स्पर्धेचा निकाल आणि बक्षीस दात्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे : प्रथम क्रमांक : संगमनेर महाविद्यालय, संगमनेर (बक्षीस ३,००१ व ट्रॉफी). हे पारितोषिक कै. विठाबाई दादा वर्पे

(पान नं. ०४ वर)

# कोल्हेवाडी ग्रामपंचायत उपसरपंचपदी इंद्रभान दिघे यांची बिनविरोध निवड

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

कोल्हेवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची निवडणूक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी कोल्हेवाडी गावाच्या लोकनियुक्त सरपंच सुवर्णा राहुल दिये यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी निवडणुकीच्या उपसरपंच पदासाठी इंद्रभान चांगदेव दिघे यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला. त्यामुळे या निवडणूक निर्णय प्रक्रियेतील निवडणूक अधिकारी बी. बी. क्षिरसागर साहेब यांनी एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे इंद्रभान चांगदेव दिघे यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली.



यावेळी सुवर्णा राहुल दिये (सरपंच), आलिंदर बाळकृष्ण दिघे (उपसरपंच), काशिनाथ वामन, मोहन वामन, सुनिता दिये, सी संगस कोल्हे, सविता बलसाने, भारती कोल्हे, काशिनाथ अरगडे, धनंजय खुळे, मनिषा खुळे, परीधाबाई खुळे तसेच भास्करराव दिघे, प्रवरा पतसंस्थेचे चेअरमन राहुल भास्करराव दिघे, अन्नसेवा मंडळाचे अध्यक्ष अमोल आप्पासाहेब दिघे, उपाध्यक्ष लक्ष्मण कारभारी कोल्हे, जनसेवा मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते मोहन कोंडाजी वामन, राजेंद्र काळे, सोपान दिघे, बाबासाहेब दिघेधे, संजय कोल्हे, प्रदिप काळे, सतीश दिघे, अमोल खुळे, प्रदिप दिघे, पोपट वाळुंज, बाजीराव कोल्हे, बढूपंत गुंजाळ, मंगेश कोल्हे, मोहन दिघे, संदिप दिघे, उमेश वामन, निलेश कोल्हे, मंगेश दिघे, रवी वामन, भाऊसाहेब दिघे व इतर सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीचे दिपक कोल्हे , ताराचंद गायकवाड, लक्ष्मण कोल्हे, अनिल कोल्हे, गणेश गुंजाळ उपस्थित होते.

# हमी भाव योजनेअंतर्गत ७४८५ क्विंटल सोयाबीन खरेदी

## रब्बी हंगामासाठी हरभरा खरेदीस सुरुवात

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

केंद्र व राज्य शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत चालू वर्षात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात आले होते. या माध्यमातून तालुक्यातील तसेच तालुक्याबाहेरील शेतकऱ्यांकडून एकूण ७४८५.५ क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आले. यासाठी सुमारे ३ कोटी ९९ लाख ८८ हजार ७४४ रुपये रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आली असून शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



खरीप हंगामातील सोयाबीन खरेदी प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे राबवल्याबद्दल पणन महामंडळाने बाजार समितीला रब्बी हंगामातील हरभरा पिकाची हमीभावाने खरेदी करण्यास परवानगी दिली आहे. ही बाब बाजार समितीसाठी गौरवास्पद मानली जात आहे.

यावर्षी शासनाने हरभरा पिकासाठी ५६५० प्रति क्विंटल असा हमीभाव जाहीर केला आहे. त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने हरभरा खरेदी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हरभरा खरेदीसाठी शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रांसह नोंदणी करणे आवश्यक आहे: ७/१२ उतारा, ८अ उतारा, आधार कार्ड प्रत, फार्मर आयडी, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत नोंदणी कालावधी दि. ५ मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ असा असून नोंदणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात करण्यात येणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष खरेदीस सुरुवात होईल.

तालुक्यातील तसेच तालुक्याबाहेरील सर्व शेतकरी बांधवांनी हरभरा पिकाची हमीभावाने विक्री करण्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन सभापती भानुदास पाटील तिकांडे, उपसभापती रोहिदास पाटील भोर तसेच सर्व संचालक मंडळाने केले आहे.



पवित्र रमजान महिन्याचा पहिला रोजा


मो. रेहान मुस्तफा मोमीन

(वय ७ वर्ष) रा. मोमीनपुरा, संगमनेर

# संपादकीय...

## ब्लॅक बॉक्सपासून सीबीआय मागणीपर्यंत वाढत जाणारा गुंता

एका अनपेक्षित अपघाताने राज्याच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात मोठी खळबळ उडाली आहे. अजितदादांच्या अकस्मात निधनाने सर्वसामान्य नागरिक अद्यापही धक्क्यात आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता घडलेली अशी घटना मनाला सहज स्वीकारता येत नाही. सत्य अधिकृतरीत्या समोर आले असले, तरी भावनिक पातळीवर अनेकांना ते पचवणे कठीण जात आहे. अशा वेळी समाजमाध्यमांवर फिरणाऱ्या विविध चर्चा, तर्क-वितर्क आणि आरोप-प्रत्यारोप यामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची बनली आहे. अपघातांमध्ये अनेकदा काही प्रश्न अनुत्तरित राहतात. तांत्रिक बाबी सर्वसामान्यांच्या आकलनापलीकडच्या असतात. त्यामुळे शंका उपस्थित होणे हे स्वाभाविक आहे. मात्र त्या शंका कोणत्या पातळीवर आणि कोणत्या हेतूने मांडल्या जातात, यालाही महत्त्व असते. या प्रकरणात काही राजकीय नेत्यांनी व्यक्त केलेल्या संशयामुळे या घटनेभोवती गूढतेचे वलय निर्माण झाले आहे. विशेषतः विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' आगीत नष्ट झाल्याची माहिती समोर आल्यानंतर चर्चांना आणखी उधाण आले. तांत्रिकदृष्ट्या अशा उपकरणांची संरचना अत्यंत मजबूत असते, हे सर्वज्ञात असल्याने लोकांच्या मनात नैसर्गिकपणे प्रश्न निर्माण झाले. या संदर्भात काही नेत्यांनी पत्रकार परिषदांमधून विविध मुद्दे उपस्थित केले. त्यांनी तांत्रिक त्रुटी, व्यवस्थात्मक कमतरता आणि घटनेच्या दिवशी घडलेल्या अपवादात्मक बाबींचा उल्लेख केला. त्यानंतर राज्यातील सत्ताधारी आणि विरोधी गटांमध्ये परस्पर प्रतिक्रिया उमटू लागल्या. काहींनी हे प्रश्न योग्य असल्याचे सांगितले, तर काहींनी त्यामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. अशा वातावरणात वस्तुस्थितीपेक्षा धारणा अधिक वेगाने पसरू लागतात. या प्रकरणात संबंधित खासगी विमान कंपनीने अद्याप सविस्तर माहिती जाहीर केलेली नाही. तसेच हवाई वाहतूक नियंत्रणाशी संबंधित अधिकृत संस्थांकडूनही तपासाच्या प्रगतीविषयी स्पष्ट निवेदन आलेले नाही. या शून्य जागेतच अफवा आणि तर्क-वितर्क भरभरून वाढतात. लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता ही विश्वास टिकवण्याची गुरुकिल्ली असते. अधिकृत माहिती वेळेवर न आल्यास संशयाचे सावट दाट होणे अपरिहार्य ठरते. राजकीय स्तरावरही या घटनेने वेगळी वळणे घेतली. सुरुवातीला काही वरिष्ठ नेत्यांनी अपघाताबाबत शंका व्यक्त केली, पण नंतर त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्याच पक्षातील इतर नेत्यांनी पुढाकार घेत तपासाची मागणी कायम ठेवली. विशेष म्हणजे, सत्ताधारी आघाडीतील घटकांनीही केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. या मागणीमुळे राजकीय वर्तुळात नवे प्रश्न निर्माण झाले. सत्तेत सहभागी असताना अशा मागणीची गरज का भासली, हा मुद्दा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर पक्षांतील अंतर्गत समीकरणेही पुन्हा चर्चेत आली. अलीकडील राजकीय घडामोडी, पक्षातील फूट आणि संभाव्य एकत्रीकरणाच्या हालचाली या सगळ्याचा संदर्भ या चर्चांमध्ये जोडला जाऊ लागला. काहींना वाटते की अपघाताविषयीची चौकशी ही केवळ सत्यशोधनासाठी आहे; तर काहींना ती राजकीय रणनीतीचा भाग वाटते. अशा वेळी सामान्य नागरिक मात्र गोंधळलेला आहे. त्याला केवळ स्पष्ट आणि निष्पक्ष सत्य हवे आहे. भावनिकदृष्ट्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीच्या निधनानंतर कुटुंबीय आणि समर्थकांमध्ये संशय निर्माण होणे असामान्य नाही. पण त्या भावनांना सार्वजनिक चर्चेचे रूप देताना जबाबदारीची जाणीव असणे गरजेचे आहे. समाजमाध्यमांच्या युगात कोणतीही अप्रमाणित माहिती क्षणार्धात लाखो लोकांपर्यंत पोहोचते. त्यामुळे अधिकृत तपास पूर्ण होण्यापूर्वी निष्कर्ष काढणे धोकादायक ठरू शकते. तपास यंत्रणांवर विश्वास ठेवणे ही लोकशाहीतील मूलभूत अपेक्षा आहे. मात्र त्या यंत्रणांनीही आपली विश्वासार्हता टिकवण्यासाठी पारदर्शकता आणि वेळेवर माहिती देणे आवश्यक आहे. या प्रकरणात जर केंद्रीय तपास संस्थेकडे चौकशी सोपवली गेली, तर तिच्या निष्कर्षांची सर्वांनाच प्रतीक्षा राहील. त्या निष्कर्षांनी सर्व प्रश्नांची उत्तरे दिली, तरच वातावरणातील तणाव निवळू शकेल. सध्या परिस्थिती अशी आहे की दुःख, संशय आणि राजकीय समीकरणे या तिन्ही घटकांचा संगम झाला आहे. अपघाताची चौकशी ही राजकीय सोयी-गैरसोयींचा भाग न होता, केवळ वस्तुनिष्ठ सत्यशोधनासाठी व्हावी, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005


# संगमनेरमध्ये खतमुल कुरआन सोहळा उत्साहात





संगमनेर

अलहम्दुलिल्लाह, हजरत कादर बादशा कादरी मस्जिद येथे गेल्या २६ वर्षांपासून सुरू असलेला १० दिवसीय खतमुल कुरआनचा पवित्र कार्यक्रम यंदाही मोठ्या श्रद्धा व उत्साहात पार पडला. पहिल्या अशऱ्यातील १० तरावीहमध्ये पूर्ण कुरआन शरीफ ऐकविण्यात आला. संगमनेर शहर व परिसरातील मोठ्या संख्येने युवक व नमाजी उपस्थित राहून नमाज अदा करत होते.

खतमुल कुरआन प्रसंगी हाफिज अहमद बरकाती यांनी कुरआन शरीफाचे पठण केले. यावेळी ट्रस्टींच्या वतीने हाफिज अहमद बरकाती यांची गुलपोशी करण्यात आली, तसेच मुक़्तदी व ट्रस्टी मंडळाच्या वतीने १ लाख १० हजार रुपयांचे नजराणे आणि वस्त्र भेट देण्यात आली. मस्जिदचे इमाम मौलाना रेहान रजा तसेच मदरशाचे नाजिम-ए-आला मौलाना हाफिज मुनव्वर साहेब यांनाही वस्त्र भेट देऊन त्यांची गुलपोशी करण्यात आली. त्याचबरोबर कादरी खानदानातील हाफिज विरद सय्यद, मौलाना वसील सय्यद आणि हाफिज फाजिल सय्यद यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन व देखरेख ट्रस्टी मंडळातील सय्यद अब्दुल सलाम कादरी, सय्यद अब्दुल अलीम कादरी, सय्यद अब्दुल रकीब कादरी (शहर काजी) आणि सय्यद मोहातसिब अब्दुल कलाम कादरी यांनी केली. नजराण्यात गरीब नवाज-चांद शावली ग्रुप, लखीमपुरा ग्रुप, गवंडीपुरा ग्रुप, मदिना नगर ग्रुप, मोमिनपुरा ग्रुप, तीन बत्ती चौक ग्रुप आणि दोस्ती ग्रुप यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या १० दिवसांत नमाज्यांसाठी जेवणाची उत्तम व्यवस्था कादरी बिरादरान व रजा-ए-कादरी कमिटी (कादरी फॅमिली) यांच्या वतीने करण्यात आली. सेवाकार्यात अझहर कादरी, फखीम कादरी, दिलमेर कादरी, जामील कादरी, मन्नान कादरी, नजीब कादरी, नूरो भाई, इमरान बागवान, काशिफ खान, आसिफ भाई, सोहेल भाई, मुस्तकीम भाई, साहिल सय्यद, मोहसिन भाई, इमरान फिटर, अल्ताफ, शोएब, कैफ भाई, हसनैन, तोहिद, फैसल, बख्तियार, काशान तसेच इतर युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रम धार्मिक वातावरणात, शिस्तबद्ध पद्धतीने आणि भाईचाऱ्याच्या भावनेत यशस्वीरीत्या पार पडला.

पान नं. ०३ वरुन...

## नुतन महाविद्यालयात जिल्हास्तरिय...

यांच्या स्मरणार्थ प्रा. (डॉ.) बाबासाहेब वर्पे यांच्याकडून देण्यात आले. द्वितीय क्रमांक : सह्याद्री महाविद्यालय, संगमनेर (बक्षीस २,००१ व ट्रॉफी). हे पारितोषिक कै. निवृत्ती म्हातारबा खतोडे (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ मधुकर खतोडे यांच्याकडून देण्यात आले. तृतीय क्रमांक : नूतन महाविद्यालय, राजापूर (बक्षीस १,००१ व ट्रॉफी). हे पारितोषिक द्रोणागिरी फार्मर प्रोड्युसर कंपनीतर्फे भारत शंकर शेलकर यांच्याकडून देण्यात आले. विजेत्या संघांना प्रगतिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड. अनिल गोडसे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक भारत शेलकर हे देखील उपस्थित होते. सदर उपक्रम महाविद्यालयाच्या आयक्यूएसी व विज्ञान विभागांतर्गत राबवण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी प्राचार्य डॉ. बाबासाहेब वर्पे यांचे मार्गदर्शन लाभले, तर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### झोळेश्वर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. झोळे. (अवसायनातील) ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

**जाहिर नोटीस**

झोळेश्वर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. झोळे. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर या अवसायनातील संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या सर्व मुदत व दाम दुप्पट ठेवीदारांना त्यांच्या एकुण ठेवीच्या ४० टक्के रक्कम देणेचे काम चालु आहे. त्यानुसार संस्थेच्या काही ठेवीदारांना ठेवीची ४० टक्के रक्कम देण्यात आली आहे. परंतु संस्थेचे उर्वरीत ठेवीदार यांनी अद्यापपावेतो त्यांच्या ठेवीची ४० टक्के रक्कम घेतलेली नाही. तरी सर्व ठेवीदारांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्या ठेवीदारांनी त्यांच्या ठेवीची ४० टक्के रक्कम अद्यापपावेतो नेलेली नाही त्यांनी हि नोटीस जाहिर झालेपासुन ठेवीची रक्कम दिनांक ११/३/२०२६ पर्यत अवसायक, झोळेश्वर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. झोळे यांचे कडुन घेवुन जावी. ज्या ठेवीदारांना एकुण ठेवीच्या ४० टक्के रक्कम देणे बाकी आहे असे ठेवीदार दिनांक ११/०३/२०२६ पर्यंत ठेव घेण्यासाठी न आलेस संस्थेकडे शिल्लक असलेली रक्कम ही दिनांक ११/३/२०२६ नंतर यापुर्वी ४० टक्के रक्कम अदा केली आहे अशा ठेवीदारांना त्यांचे मागणी नुसार समान पध्दतीने रक्कम अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी

दिनांक ०२.०३.२०२६

(आर एस वाकचौरे)
अवसायक
झोळेश्वर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. झोळे. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर


READ E- NEWS ON
Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta



**पाहिजेत**
नामांकित साऊथ इंडीयन कॅफेसाठी
कॅशियर | हेल्पर
साऊथ इंडीयन कुक
१ ते २ वर्षांचा कामाचा अनुभव आवश्यक
संगमनेर
9518722868

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**पाहिजेत**
अकाऊंटट - २ जागा (टॅली कोर्स)
ड्रायव्हर - ३ जागा
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
9370071717
9822791484

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**पाहिजेत** सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**पाहिजेत**
होलसेल दुकानासाठी मुले/ मुली पाहिजेत
अनुभवास प्राधान्य
हेल्पर - २
सेल्समन - २
7020585298
9422905155

**पाहिजेत**
मॅनेजर - १ (पुरुष)
पेट्रोलपंप चालविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
राजश्री पेट्रोलियम, संगमनेर खुर्द-समनापूर, शिर्डी बायपास रोड,रायते, ता. संगमनेर
9850203275
9657203042

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME SANDEEP SAMPAT JAMBUKAR
TO NEW NAME AS SANDIP SAMPAT JAMBUKAR
ADD - GUNJALWADI, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत** कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,

| | | |
|---|---|---|
| RMO डॉक्टर्स - (MBBS,BAMS, BHMS) | | सकाळ -२, दुपार-२ सायंकाळ -२ |
| नर्स - (BSC GNM) | | सकाळ -२, दुपार-२ सायंकाळ -२ |
| सिस्टर इनचार्ज- | Bsc Nursing/MBA | |
| डाटा ऐंट्री ऑपरेटर | MJPJAY | जागा -२ |
| क्लेम डॉक्टर - MJPJAY / Mediclaim | | जागा - ०२ |
| रिसेप्शन - महिला/पुरुष | | जागा - ०२ |
| वॉर्ड मॅनेजर | | जागा - ०१ |

8888882225 9766855593

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरुप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**ड्रायव्हर पाहिजे**
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME WASIM ABDUL KARIM SHAIKH
TO NEW NAME AS WASIM ABDUL KAREEM
ADD -DAKE MALA, NAIKWADPURA, PUNE NAKA JAVAL, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR,422605

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977




卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्यमन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# झोळेश्वर विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व सभागृह भूमिपूजन उत्साहात

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

बुधवार दिनांक २५/०२/२०२६ रोजी झोळेश्वर आदर्श ग्रामविकास विद्यालय, झोळे-गणेशवाडी, ता. संगमनेर या विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व सभागृह भूमिपूजन समारंभ जलसंपदा खात्यातील निवृत्त अधिक्षक अभियंता इंजि. सुनील प्रदक्षिणे साहेब, इंजि. अरविंद गुंजाळ साहेब व दैनिक युवावार्ताचे संपादक मा. किसन भाऊ हासे साहेब यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमान शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ, झोळेचे अध्यक्ष इंजि. नानासाहेब खर्डे साहेब हे होते. तसेच प्रमुख उपस्थितांमध्ये किरण नवले, संचालक शेतकी संघ, सरपंच प्रगतीताई बोऱ्हाडे, उपसरपंच मा. गोविंदराव खर्डे, झोळे माध्यमिक शिक्षक बँकेचे व्हा. चेअरमन अर्जुन वाळके, शिक्षक नेते शिंदे, संस्थापक अध्यक्ष झोळेश्वर विद्यालय ड शिवाजीराव खर्डे, पुंजा काळे, दिनकर एरंडे, अर्जुन नंदू एरंडे, गोविंद वाळे, भाऊसाहेब एरंडे, मधुकर खर्डे, अण्णासाहेब नवले, सुभाष गुरुकुले, गणेश गांडोळे, प्राध्यापक उत्तम खर्डे, गिरजू एरंडे, सूर्यभान रामनाथ खर्डे, सुभाष खर्डे, बाजीराव वाळे, ड सुशांत वाळे, सचिन खर्डे, सोपान खर्डे, दादा उनवणे, सोपान वाळे, निवृत्ती खर्डे, राजेंद्र एरंडे, सोमनाथ वाळे, दत्तात्रय खर्डे, विठ्ठल वाळे, बनसोडे, अनिल वाळे, सुरज वाळे, बाळासाहेब एरंडे, बाळासाहेब खर्डे, वाल्मीक काळे, बाबासाहेब एरंडे, संदीप एरंडे, विजय गुंजाळ, ललिता नवले, मुक्ता खर्डे व झोळे पंचक्रोशीतील सर्व संस्थांचे पदाधिकारी आणि हनुमान शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळाचे सर्व पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, शिक्षक पालक संघाचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक एल. डी. खेमनर यांनी केले. सुरुवातीला सर्व पाहुण्यांच्या हस्ते इंजि. सुनील प्रदक्षिणे साहेब यांची सनदी लेखापाल असणारी दिवंगत कन्या 'मधुरा' हिच्या स्मरणार्थ विद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ लावलेल्या प्राजक्ताच्या झाडास खत-पाणी घालण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष इंजि. नानासाहेब खर्डे यांच्या संकल्पनेतून, झोळेश्वर आदर्श ग्रामविकास विद्यालयाच्या वतीने झोळे गावातील सर्व नागरिकांसाठी कन्या स्मरण योजना ही अनोखी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार गावातील कुठल्याही नागरिकांनी त्यांच्या प्रिय कन्येची आठवण म्हणून विद्यालयाच्या प्रांगणात आपल्या आवडत्या वृक्षाची लागवड करावी. या वृक्षाचे



संगोपन व काळजी विद्यालय घेईल.

कालौघात आवडती कन्या सासुरवाशीण झाल्यानंतर जेव्हा माहेरी येईल, तेव्हा तिच्या जैविक माहेराबरोबरच विद्यालयाच्या प्रांगणातील वृक्ष तिला दुसऱ्या माहेराचा आनंद देईल. आपल्या लेक सुना, नातवंडे यांच्या सोबतीने ती या वृक्षाखाली हक्काने विसावू शकेल. 'कन्या स्मरण योजने' ची सुरुवात आज इंजि. नानासाहेब खर्डे यांची नवजात नात कु. वैदेही प्रसाद खर्डे हिच्यासाठी लावण्यात आलेल्या बकुळ वृक्षाच्या रोपणापासून झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बकुळाचे वृक्षारोपण पार पडले. यानंतर विद्यालयासाठी अत्यावश्यक असणाऱ्या १४०० वर्गफुट क्षेत्रफळाच्या नूतन सभागृहाच्या इमारतीचे भूमिपूजन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

यानंतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात पार पडलेल्या विविध स्पर्धा आणि उपक्रम यांमध्ये यशस्वी झालेल्या विजेत्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सन २०२५-२६ या कालावधीतील आदर्श विद्यार्थी म्हणून इयत्ता दहावीतील कृष्णा गोकुळ नवले या विद्यार्थ्यास सन्मान मिळाला. आदर्श विद्यार्थिनी म्हणून कु. कावेरी सोमनाथ वाळे व कु. कावेरी राजेंद्र एरंडे या विद्यार्थिनींना मान मिळाला. प्रशस्तीपत्रक, ट्रॉफी व रोख रक्कम देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. आपल्या प्रमुख भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. किसन भाऊ हासे यांनी शिक्षण केवळ नोकरीसाठी नव्हे, तर सुजाण व शहाणा नागरिक होण्यासाठी आवश्यक आहे. शिक्षण घेऊन समाजात आपली नवी ओळख निर्माण करून, पुन्हा गावाकडे परतून समाजाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे, अशी भावना व्यक्त केली.

इंजि. सुनील प्रदक्षिणे यांनी सांगितले की, माझी लाडकी कन्या कै. मधुरा प्रदक्षिणे हिचे स्मरण म्हणून आपण प्राजक्ताची जोपासना केली आहे. मी आपणांला ग्वाही देतो की, आपल्या शाळेतील कुठलाही विद्यार्थी पैशाअभावी शिक्षणास मुकणार नाही. गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना लागणारी सर्व मदत मी करत राहीन, मात्र माझ्या या दातृत्वाचा कुठेही आणि कोणत्याही प्रकारे गवगवा केला जाऊ नये. इंजि. अरविंद गुंजाळ यांनी मला या शैक्षणिक यज्ञाशी जोडून घ्या, आपणांस येणाऱ्या आर्थिक अडचणीत मी तुमच्या पाठीशी उभा असेल, असा विश्वास दिला. याप्रसंगी संपादक किसन भाऊ हासे तसेच इंजि. अरविंद गुंजाळ यांनी प्रत्येकी अकरा हजार रुपयांची देणगी सभागृहासाठी प्रदान केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात इंजि. नानासाहेब खर्डे यांनी गावकऱ्यांच्या मदतीचा आणि आर्थिक दातृत्वाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. या विद्यालयाच्या माध्यमातून गावातील नवी पिढी अधिक समजंस, संस्कारी, शहाणी निर्माण होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती चव्हाण व अनाजी पवार यांनी केले व आभार प्रदर्शन नवनाथ कोटकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर मोलाचे योगदान लाभले.

# मियावाकी जंगलातून हरित महाराष्ट्राची नवी दिशा

## डॉर्फ केटल जंगल कप २.० चा पुरस्कार वितरण सोहळा संगमनेरमध्ये उत्साहात

**संगमनेर**

**(युवावार्ता प्रतिनिधी)–**

निसर्ग संवर्धनासाठी शासन, समाज आणि उद्योग क्षेत्र एकत्र आल्यास मोठे परिवर्तन घडू शकते, याचे प्रेरणादायी उदाहरण 'डॉर्फ केटल जंगल कप २.०' च्या पुरस्कार सोहळ्यात पाहायला मिळाले. डॉर्फ केटल केमिकल्स इंडिया लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमातून, सप्रेम (एसएपीआरईएम) व नवदृष्टी संस्थेच्या सहकार्याने राज्यात राबविण्यात आलेल्या मियावाकी वृक्षलागवड स्पर्धेमुळे हरित चळवळीला नवी दिशा मिळत आहे.




अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ढोले पाटील लॉन्स येथे झालेल्या या सोहळ्यास राजेंद्र सिंह, चैतराम पवार, भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा परिषद सीईओ आनंद भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते. मियावाकी पद्धतीनुसार एका गुंठ्यात सुमारे ४२ प्रजातींची ३०० देशी झाडे लावली जातात. घनदाट लागवडीमुळे २-३ वर्षांत जैवविविधतेने समृद्ध जंगल तयार होते. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील १५५ हून अधिक गावांमध्ये मियावाकी जंगले उभी राहिली आहेत.

विजेते ग्रामपंचायती : प्रथम : सोनेवाडी (ता. संगमनेर) - १,००,०००. द्वितीय : लहित खुर्द (ता. अकोले) - ७५,०००. तृतीय : कुसूर (ता. येवला) व डोंगरगाव (ता. कारंजा, जि. वाशिम) - ५०,००० (विभागून). तसेच उंबरडा, रेंडाळे, विसापूर, मालदाड, निळवंडे व साकूर ग्रामपंचायतींना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले.

मार्गदर्शन करताना राजेंद्र सिंह यांनी निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. निसर्ग जपणाऱ्यांना निसर्गाचा सन्मान मिळतो, असे ते म्हणाले. कंपनीचे सीएसआर प्रमुख संतोष जगधने यांनी झाडांकडून सहकार्य आणि देण्याची वृत्ती शिकण्याचा संदेश दिला. जिल्हा परिषद सीईओ आनंद भंडारी यांनी शासन-समाज-कॉर्पोरेट समन्वयातून सकारात्मक बदल शक्य असल्याचे नमूद केले. सप्रेम संस्थेचे डॉ. प्रकाश गायकवाड यांनी ही हरित चळवळ प्रत्येक गावात पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला.

'डॉर्फ केटल जंगल कप' ही केवळ स्पर्धा नसून, पर्यावरण संवर्धनाची व्यापक लोकचळवळ ठरत आहे. मियावाकी जंगलांमुळे महाराष्ट्र हरित आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे जात आहे. जाधव यांनी शाळेने आयोजित केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# मोफत लाभाच्या योजनांमुळे समाज पंगू होतोय – पोपटराव पवार

**जळगाव**

**(युवावार्ता प्रतिनिध)-**

जनतेला मोफत लाभ देणाऱ्या योजनांमुळे समाज पंगू होत असून, मतपेटीत दुरुस्ती होत नाही तोपर्यंत समस्या सुटणार नाहीत, असे प्रतिपादन हिवरे बाजाराचे उपसरपंच पोपटराव पवार यांनी जळगावमध्ये केले. ते केशव स्मृती प्रतिष्ठान व जळगाव जनता सहकारी बँक यांच्या वतीने आयोजित डॉ. आचार्य अविनाशी सेवा पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. रविवारी (दि. १ मार्च) छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहात हा कार्यक्रम झाला.



मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून पोपटराव पवार, पुरस्कारार्थी समाजसेविका अनुराधा भोसले (कोल्हापूर) व सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे विलास शिंदे (मोहाडी, जि. नाशिक), केशव स्मृती सेवा संस्था समूहाचे प्रमुख डॉ. भरत अमळकर, जळगाव जनता बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती, दिलीप चोपडा उपस्थित होते. पोपटराव पवार यांच्या हस्ते सन्मानार्थींना पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानपत्र वाचन डॉ. वैजयंती पाध्ये, दीप्ती बारी यांनी केले.

सन्मानाला उत्तर देताना अनुराधा भोसले यांनी जळगाव शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी केशव स्मृती प्रतिष्ठानने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. ओला व सुका कचरा घरातच वेगळा करण्यास प्रोत्साहन द्या, कचरा वेचकांना सोबत घ्या. यातून हरित उद्योग उभा राहू शकतो. यामध्ये मदतीसाठी तयार असल्याचे आश्वासन जाधव यांनी दिले. विलास शिंदे यांनी शेती क्षेत्रातील प्रश्नांचा गुंता एकटी व्यक्ती सोडवू शकत नाही. त्यासाठी समूहाची ताकद हवी. त्या दृष्टीने प्रत्येक गावात काम उभे राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# इराण–इस्राईल संघर्ष : जागतिक परिणाम आणि भारताची भूमिका

इराण आणि इस्राईल यांच्यातील संघर्ष हा आधुनिक मध्यपूर्वेतील सर्वात गुंतागुंतीचा आणि दीर्घकालीन तणाव मानला जातो. या संघर्षाची मुळे १९७९ सालच्या इराणी इस्लामिक क्रांतीपर्यंत पोहोचतात. त्याआधी इराण आणि इस्राईल यांच्यात उघड शत्रुत्व नव्हते, परंतु क्रांतीनंतर नव्या इस्लामिक नेतृत्वाने इस्राईलला वैचारिक आणि धार्मिकदृष्ट्या विरोध करण्याची स्पष्ट भूमिका घेतली. इराणच्या सत्ताधाऱ्यांनी इस्राईलला अवैध राष्ट्र म्हणून संबोधले, तर इस्राईलने इराणला आपल्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका मानले. यानंतर दोन्ही देशांमध्ये थेट युद्ध झाले नसले तरी गुप्त कारवाया, सायबर हल्ले, गुप्तचर यंत्रणांमधील संघर्ष आणि प्रादेशिक गटांच्या माध्यमातून अप्रत्यक्ष युद्ध सातत्याने चालू राहिले. या संघर्षात धार्मिक विचारसरणी, प्रादेशिक वर्चस्व, अणुकार्यक्रम आणि महासत्तांचे राजकारण या सर्व घटकांचा गुंता आहे.




इराणच्या अणुकार्यक्रमाचा मुद्दा हा या संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला आहे. इराणचा दावा आहे की त्याचा अणुकार्यक्रम ऊर्जा निर्मितीसाठी आणि वैद्यकीय संशोधनासाठी आहे; परंतु इस्राईल आणि अमेरिकेसह पाश्चिमात्य देशांना संशय आहे की इराण अण्वस्त्र विकसित करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. इस्राईलने स्पष्ट इशारा दिला आहे की इराणला अण्वस्त्र प्राप्त होऊ देणार नाही आणि गरज पडल्यास लष्करी कारवाई करेल. यामुळे इराणवर अनेक आर्थिक निर्बंध लादले गेले, त्याच्या अणुस्थळांवर गुप्त हल्ल्यांचे आरोप झाले आणि सायबर युद्धाचे प्रकार घडले. अणुशक्तीचा प्रश्न केवळ लष्करी नसून तो प्रादेशिक सत्तासंतुलनाशी निगडित आहे, कारण अण्वस्त्रसज्ज इराण हा मध्यपूर्वेतील समीकरणे पूर्णपणे बदलू शकतो.

या संघर्षात प्रॉक्सी युद्धाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. इराणवर आरोप आहे की तो लेबनॉनमधील Hezbollah, गाझामधील Hamas आणि येमेनमधील Houthis यांसारख्या गटांना आर्थिक व लष्करी मदत पुरवतो. हे गट इस्राईलवर रॉकेट हल्ले करतात किंवा सीमाभागात तणाव निर्माण करतात. प्रत्युत्तरादाखल इस्राईल सीरिया, लेबनॉन किंवा गाझातील लक्ष्यांवर हवाई हल्ले करतो. त्यामुळे संघर्ष थेट दोन राष्ट्रांमध्ये न होता तिसऱ्या देशांच्या भूमीवर घडतो. यामुळे लेबनॉन, सीरिया, गाझा पट्टी आणि रेड सी परिसर हे संवेदनशील क्षेत्र बनले आहेत. या प्रकारचे युद्ध दीर्घकाळ चालू राहू शकते, कारण त्यात दोन्ही देश पूर्ण युद्ध टाळत एकमेकांना मर्यादित स्वरूपात प्रत्युत्तर देतात.

महासत्तांची भूमिका या संघर्षात निर्णायक ठरते. अमेरिका इस्राईलची प्रमुख रणनीतिक भागीदार आहे आणि दरवर्षी अब्जावधी डॉलरची संरक्षण मदत इस्राईलला पुरवते. अमेरिकेचे मध्यपूर्वेतील हितसंबंध ऊर्जा सुरक्षा, इस्राईलचे संरक्षण आणि प्रादेशिक स्थैर्य यांच्याशी निगडित आहेत. दुसरीकडे रशिया आणि चीन इराणशी आर्थिक व राजनैतिक संबंध राखतात. चीन हा इराणकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करतो, तर रशिया आणि इराण यांच्यात संरक्षण व तांत्रिक सहकार्य आहे. त्यामुळे हा संघर्ष केवळ प्रादेशिक न राहता जागतिक सत्तासंतुलनाचा भाग बनतो. अमेरिकेच्या सहभागामुळे संघर्ष वाढण्याची शक्यता असते, तर रशिया आणि चीन यांची भूमिका संतुलन राखण्याची किंवा कधी कधी अप्रत्यक्ष पाठिंबा देण्याची असू शकते.

ऊर्जा राजकारण हा या संघर्षाचा सर्वात संवेदनशील आर्थिक घटक आहे. स्ट्रेट ऑफ हॉरमुज ही सामुद्रधुनी जगातील सुमारे २० टक्के कच्च्या तेलाच्या वाहतुकीसाठी वापरली जाते. दररोज अंदाजे १७ ते २० दशलक्ष बॅरल तेल या मार्गाने जगभर पोहोचते. जर येथे लष्करी तणाव वाढला, तर तेलवाहतुकीत अडथळे निर्माण होऊ शकतात आणि जागतिक तेलदरात तात्काळ वाढ होऊ शकते. तेलदर वाढल्यास जागतिक महागाई वाढते, वाहतूक खर्च वाढतो आणि औद्योगिक उत्पादनावर परिणाम होतो. रेड सी आणि सुएझ कालवा हे देखील आशिया-युरोप व्यापाराचे प्रमुख मार्ग आहेत. येथील अस्थिरतेमुळे जहाजांना आफ्रिकेभोवती वळसा घ्यावा लागतो, ज्यामुळे वेळ आणि खर्च वाढतो. विमा प्रीमियम वाढल्यामुळे निर्यात-आयात व्यवहार महाग होतात.

संरक्षण उद्योगासाठी अशा संघर्षाचे आर्थिक परिणाम वेगळे असतात. एअर डिफेन्स सिस्टम, ड्रोन तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, क्षेपणास्त्र आणि गुप्तचर प्रणालींची मागणी वाढते. युद्धजन्य परिस्थितीत संरक्षण कंपन्यांना मोठे करार मिळतात. आधुनिक युद्धामध्ये तंत्रज्ञानाची भूमिका वाढल्याने संशोधन व विकासावर मोठी गुंतवणूक होते. त्यामुळे जागतिक संरक्षण उद्योगाला अशा तणावातून आर्थिक चालना मिळते.

पर्यटन उद्योगावर या संघर्षाचा थेट परिणाम होतो. इस्राईलमध्ये दरवर्षी लाखो पर्यटक येतात. जेरुसलेम, बेथलेहेम आणि इतर धार्मिक स्थळांवर होणाऱ्या यात्रांवर परिणाम होतो. संघर्ष वाढल्यास विमानसेवा रद्द होतात, प्रवास सल्ले जारी होतात आणि पर्यटन उद्योगाला मोठा फटका बसतो. मध्यपूर्वेतील अस्थिरता संयुक्त अरब अमिराती, जॉर्डन आणि इजिप्तसारख्या देशांतील पर्यटनावरही परिणाम करू शकते.

भारतासाठी हा संघर्ष अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण भारत आपल्या ऊर्जा गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेवर अवलंबून आहे. भारत सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. तेलदरात प्रति बॅरल १० डॉलर वाढ झाली तर भारताचा आयात खर्च अब्जावधी डॉलरने वाढतो. यामुळे पेट्रोल-डिझेल दर वाढतात, महागाई वाढते आणि रुपयावर दबाव येतो. औद्योगिक उत्पादन खर्च वाढल्याने ग्राहकांना वस्तू महाग मिळतात. विमान कंपन्यांचा इंधन खर्च वाढतो आणि तिकिटे महाग होतात. शेअर बाजारात अस्थिरता वाढते.

भारतीय नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. इस्राईलमध्ये अंदाजे १८ ते २० हजार भारतीय नागरिक राहतात, त्यात मुख्यतः केअरगिव्हर, आयटी व्यावसायिक आणि विद्यार्थी यांचा समावेश आहे. लेबनॉनमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेत भारतीय सैनिक कार्यरत आहेत. इराणमध्ये काही विद्यार्थी आणि व्यापारी आहेत. याशिवाय गल्फ देशांमध्ये लाखो भारतीय कामगार आहेत. जर संघर्ष लेबनॉन किंवा रेड सी परिसरात वाढला, तर भारतीय नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी लागू शकते. अशा परिस्थितीत विमान आणि नौदलाच्या मदतीने आपत्कालीन स्थलांतर योजना तयार ठेवणे आवश्यक ठरते.

भारताचे इस्राईलसोबत संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मजबूत संबंध आहेत, तर इराणसोबत चाबहार बंदर प्रकल्प आणि ऊर्जा सहकार्य आहे. त्यामुळे भारताला अत्यंत संतुलित परराष्ट्र धोरण राखावे लागते. कोणत्याही एका बाजूला स्पष्टपणे झुकल्यास दुसऱ्या देशाशी संबंध ताणले जाऊ शकतात. भारताने ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, सामरिक तेलसाठे वाढवणे आणि समुद्री सुरक्षा मजबूत करणे आवश्यक आहे.

निष्कर्षतः, इराण-इस्राईल संघर्ष हा केवळ दोन राष्ट्रांमधील वाद नसून जागतिक राजकारण, ऊर्जा नकाशा, संरक्षण उद्योग आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यांचा गुंता आहे. या संघर्षाचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर, पर्यटनावर, उद्योगावर आणि भारतासारख्या देशांच्या ऊर्जा सुरक्षेवर स्पष्टपणे होतो. परिस्थिती मर्यादित तणावात राहिली तर जागतिक बाजार काही प्रमाणात स्थिर राहू शकतो; परंतु संघर्ष व्यापक युद्धात परिवर्तित झाला तर तेलदरात तीव्र वाढ, जागतिक मंदी आणि व्यापक अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतासाठी ही परिस्थिती आव्हानात्मक असली तरी संतुलित धोरण, आर्थिक नियोजन आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी सज्जता यांद्वारे तो या संकटाचा प्रभाव मर्यादित ठेवू शकतो.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरु होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे





नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ............ 05
सेल्सगर्ल............ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर.................. 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर


# परदेशात अडकलेल्या नागरिकांशी प्रशासनाकडून संपर्क - ना. विखे

युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी - मध्यपूर्व व आखाती प्रदेशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अडकलेल्या नागरीकांशी संपर्क साधण्यात आला असून भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय व महाराष्ट्र शासनाने परदेशात अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षिततेसाठी पावले उचलली आहेत. या भागात अडकलेल्या अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असल्याची माहिती जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकतीच माध्यमांशी बोलताना दिली.



परदेशात अडकलेल्या नागरीकांच्या नातेवाईकांनी नियंत्रण कक्षात संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले. उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले. परदेशात अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेवर महाराष्ट्र शासन व परराष्ट्र मंत्रालय यांचे बारकाईने लक्ष असूनत्यांच्या संरक्षणासाठी व आवश्यकतेनुसार त्यांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रशासनाचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. राज्य सरकारने केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सूचनेनूसार चोवीस तास हेल्पलाईन नंबर देण्यात आले असून संपर्कासाठी ०२२-२२०२७९९० असा क्रमांक देण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षातील ०२४१-२३२३८४४. व २३५६९४० क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन नंबर मंत्री विखे पाटील यांनी केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील जे नागरिक या युद्धजन्य परिस्थितीत अडकले आहेत त्यांना

## जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्षाची स्थापना

विमानसेवा बंद असल्याने थांबण्याची वेळ आली आहे.या सर्वांशी जिल्हाधिकारी कार्यालयाने संपर्क केला असून काही नागरीकांशी व्यक्तिगत आपणही संपर्क करून दिलासा दिला असल्याचे त्यांनी सांगितले.माहिती देण्यासाठी व मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्ष,जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

विविध देशांतील भारतीय दूतावासांचे २४ x ७आपत्कालीन क्रमांक उपलब्ध - तात्काळ मदतीसाठी इस्त्रायल (तेल अवीव),इराण (तेहरान), पॅलेस्टाईन (रामल्लाह),कतार (दोहा),सौदी अरेबिया (रियाध), संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी), कुवैत, बहरीन, मस्कत, जॉर्डन आणि इराक (बगदाद) येथील भारतीय दूतावासांनी विशेष आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक, व्हॉट्सप क्रमांक आणि ईमेल आयडी जाहीर केले आहेत. नागरिकांनी गरजेनुसार या क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

# संगमनेर नगर परिषदेच्यावतीने ५ ते ७ मार्च छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य पूर्णाकृती स्मारक उभारण्याच्या दृष्टीने स्मारकाच्या स्वरूपाबाबत नागरिकांचे थेट मत जाणून घेण्यासाठी संगमनेर नगरपालिकेच्या वतीने दि. ५ ते ७ मार्च दरम्यान विशेष मतदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनी दिली आहे

या कार्यक्रमाबाबत अधिक माहिती देताना डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, या स्मारकासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सत्यजीत तांबे यांनी १८ डिसेंबर २०२३ रोजी राज्य शासनाकडे पत्रव्यवहार करून संगमनेर बस



स्थानकासमोरील १५ x १५ मीटर जागा संगमनेर नगरपालिकेकडे वर्ग करण्याची मागणी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मान्यतेने ही जागा संगमनेर नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आली.

त्यामुळे शहराच्या प्रमुख ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य व प्रेरणादायी स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, स्मारकाच्या स्वरूपाबाबत संगमनेर शहरातील शिवप्रेमी व नागरिकांनी विविध

## संगमनेरकरांनो, कसं हवंय तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक ? नोंदवा आपले मत...

भावना व्यक्त केल्या आहेत. काही नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्णाकृती उभे स्मारक असावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तर काहींनी सिंहासनाधीश्वर स्वरूपातील स्मारक व्हावे असे मत नोंदविले आहे. तसेच अनेक शिवभक्तांनी अश्वारूढ स्वरूपातील स्मारक उभारण्याची मागणी केली.

नागरिकांच्या या सर्व भावना आणि सूचनांचा विचार करुन संगमनेर नगरपालिकेने लोकसहभागातून अंतिम निर्णय घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार, ५, ६ आणि ७ मार्च या तीन दिवसांच्या कालावधीत संगमनेर बस स्थानकावरील सुप्रीम पावभाजी समोर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात पूर्णाकृती उभे स्मारक, पूर्णाकृती सिंहासनाधीश्वर स्मारक व पूर्णाकृती अश्वरूढ स्मारक या तीनही स्मारकांचे संभाव्य ३ डी प्रतिमा नागरिकांसाठी ठेवण्यात येणार असून शहरातील नागरिकांना प्रत्यक्ष मतदानाद्वारे आपल्या पसंतीच्या स्मारकाची निवड करण्याची संधी दिली जाणार आहे. स्मारक उभारणी प्रक्रियेत पारदर्शकता, लोकसहभाग आणि नागरिकांच्या भावनांचा सन्मान राखण्याचा हा प्रयत्न असल्याचे संगमनेर नगरपालिकेने स्पष्ट केले. संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले अमूल्य मत द्यावे, असे आवाहन संगमनेर नगरपरिषद यांच्या वतीने करण्यात आले केले.



संगमनेर – संगमनेर नगर पालीकेच्यावतीने सोमवारी शहरातील महत्वाच्या रस्त्यावरील व बाजारपेठेतील काही ठिकाणावरील अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात काढले. पुन्हा अतिक्रमण करू नये अशा सुचना दिल्या. मात्र दुसऱ्याच दिवशी काही ठिकाणी पुन्हा छोट्या व्यावसायीकांनी अतिक्रमण करण्यास सुरूवात केली आहे. दरम्यान शहरातील कुंभारआळा भागात काही दिवसापूर्वी अतिक्रमण काढली होती त्या भागातील आजची स्थितीचे बोलके छायाचित्र.

छाया –नप्रसाद सुतार (शिरसाठ),संगमनेर


सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
लहान मुलांसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२
DR. UJWALA JATHAR
Pediatrician & Neonatalogist

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी लेडीज वेअर
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25